संत रविदास पुरस्कार योजना.
नियमावली.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- संरपु २००४/प्र.क्र. १६४/मावक ४,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १६ जुलै, २००४.

2 1 JUL 2004

वाचा :- महाराष्ट्र चर्मकार संघटना, अमरावती यांचे दिनांक १५.१०.२००३ चे निवेदन.

**शासन निर्णय :-** राज्यातील चर्मकार समाज व इतर दलित समाजाच्या उध्दारासाठी कार्य करणा-या व्यक्ती / संस्थांना संत रविदास यांच्या जयंती दिनी दिनांक ६ फेब्रुवारी रोजी पुरस्कार देऊन सन्मानित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्या अनुषंगाने संत रविदास पुरस्कार योजना सुरु करण्यास शासन मंजूरी देत आहे. सदर योजना ही डॉ.बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार योजनेच्या धर्तीवरच आहे. त्याच आधारे सोबतच्या परिशिष्ट "अ. ब, क आणि ड" मध्ये नमूद केलेल्या संत रविदास पुरस्कार नियमावलीस शासन मान्यता देत आहे.

२. या योजनेवर येणारा खर्च हा "२२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण-०१, मागासवर्गीयांचे कल्याण, ८०० इतर खर्च मागासवर्गीयांचे कल्याण (एक) (ए) स्वयंसेवी संस्थांना अनुदाने (२२२५ ०९१ ६) मागणी क्रमांक एन-४" या लेखाशिर्षाखालील चालू वर्षाच्या आर्थिक तरतूदीमधून भागविण्यात यावा.

३. सदर निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३२३/०४/व्यय-१४, दिनांक १५.३.२००४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(नं.मा.शिलवंत)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे समाजकल्याण अधिकारी,
महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई/ महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर.
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
निवड नस्ती मावक-४

शासन निर्णय क्र. संरपु २००४/प्र.क्र. १८४/मावक ४, दिनांक १६ जुलै, २००४ चे सहपत्र

## विवरणपत्र "अ"

चर्मकार समाज व इतर दलित समाजाच्या उध्दारासाठी कार्य करणाऱ्या
व्यक्ती / संस्थांना "संत रविदास पुरस्कार" या राज्य पुरस्कारासाठी नियम

| अ.क्र | बाब | तपशील |
|---|---|---|
| १ | संक्षिप्त शीर्षक आणि व्याप्ती | ह्या नियमांना चर्मकार समाज व दलित समाजाच्या उध्दारासाठी उत्कृष्ट कामाकरिता "संत रविदास राज्य पुरस्कार" नियम असे संबोधण्यात यावे. (यापुढे "पुरस्कार" असे नमुद केले आहे.) हे नियम राज्यातील सर्व जिल्ह्यांसाठी लागू राहतील. |
| २ | उद्दिष्ट | चर्मकार समाज व दलित समाजाच्या उध्दारासाठी काम करीत असलेल्या व्यक्ती/सामाजिक संस्थांच्या कामाची दाद द्यावी व इतर कार्यकर्त्यांना त्यापासून प्रेरणा मिळावी. जेणेकरुन सामाजिक उत्थापनासाठी कार्यकर्ते सरसावून पुढे यावेत. |
| ३ | सामाजिक कार्याचे स्वरुप | या योजनेनुसार चर्मकार समाज व दलित समाज इत्यादींचे समाजातील दुर्बल घटकांचे कल्याणासाठी झटणारे नामवंत समाजसेवक व सामाजिक संस्था असाव्यात. |
| ४ | पुरस्कार | पुरस्कार पुढीलप्रमाणे राहील :-<br>__व्यक्तीसाठी__<br>१) शासनाने मान्यता दिलेले सन्मानपत्र<br>२) रु. २१,०००/- रोख रक्कम (रुपये एकवीस हजार फक्त)<br>३) व्यक्तीस एक शाल किंवा साडीखण व श्रीफळ<br><br>__सामाजिक संस्थांसाठी__<br>१) शासनाने मान्यता दिलेले सन्मानपत्र<br>२) रु. ३०,००१/- रोख पुरस्कार (रुपये तीस हजार एक फक्त)<br>३) शाल व श्रीफळ |
| ५ | पात्रता | __व्यक्तीसाठी__<br>१) या योजनेनुसार चर्मकार समाज व दलित समाज इत्यादींचे सामाजिक दुर्बल घटकांचे कल्याणासाठी झटणारे नामवंत समाजसेवक असावेत.<br>२) सामाजिक कल्याण क्षेत्रात कमीत कमी १५ वर्षे कार्य केलेले असावेत.<br>३) पुरस्कार देताना अशा सामाजिक कार्यकर्त्यांचे वय खालीलप्रमाणे असावे :-<br>अ) पुरुष ५० वर्षे अथवा त्यापेक्षा जास्त<br>ब) स्त्रीया ४० वर्षे अथवा त्यापेक्षा जास्त<br>अपवादात्मक प्रकरणी वरील वय शिथिल करण्याचे अधिकार शासनाने यासाठी नियुक्त केलेल्या समितीकडे राहतील.<br>४) कोणत्याही व्यक्तीस त्याच्या आयुष्यात एकापेक्षा अधिक वेळा पुरस्कारासाठी पात्र समजण्यात येणार नाही.<br>५) हा पुरस्कार मिळण्यास जात, धर्म, लिंग, क्षेत्र ह्या गोष्टींचा विचार केला जाणार नाही. |

| | | |
|---|---|---|
| | | ६) पुरस्कार मिळण्यास आमदार / खासदार / जिल्हा परिषदेचा सभासद किंवा कोणताही पदाधिकारी पात्र असणार नाही.<br><br><u>सामाजिक संस्थांसाठी</u><br>१) समाजकल्याण क्षेत्रात चर्मकार समाज व दलित समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण. आरोग्य, अस्पृश्यता निर्मुलन, अंधश्रध्दा रुढी निर्मुलन, जनजागरण इत्यादी क्षेत्रात कार्य करणाऱ्या सामाजिक संस्थांना हा पुरस्कार दिला जाईल.<br>२) स्वयंसेवी संस्था, पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० व / वा सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट अनुसार पंजीबध्द असावी.<br>३) स्वयंसेवी संस्थेचे वरील क्र. १ मध्ये दर्शविलेले समाजकल्याण क्षेत्रातील सेवा व कार्य १० वर्षाहून अधिक असावे. विशेष मौलिक व भरीव काम करणाऱ्या संस्थांच्या बाबतीत अट अपवाद म्हणून शिथिल करण्यात येईल.<br>४) स्वयंसेवी संस्था राजकारणापासून अलिप्त असावी. तसेच तिचे कार्य व सेवा ही पक्षातीत व राजकारणापासून स्वतंत्र व अलिप्त असावी.<br>५) जात, धर्म, पंथ, क्षेत्र इत्यादींचा विचार न करता फक्त समाजसेवा आणि समाजाचा विकास या क्षेत्रातील कामाचा विचार करुनच हा पुरस्कार स्वयंसेवी संस्थांना दिला जावा. |
| ६ | पुरस्कारांची संख्या | <u>व्यक्तींसाठी</u><br>एक पुरस्कार देण्यात येईल<br><u>सामाजिक संस्थांसाठी</u><br>एक पुरस्कार देण्यात येईल. |
| ७ | अर्जाच्या शिफारशीची पध्दत | १) जिल्हाधिकारी / मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद / विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी त्यांच्या जिल्ह्यातील / संस्था याबाबतच्या शिफारशी संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे विहित नमुन्यात व ठराविक मुदतीत पाठवाव्यात.<br>२) शिफारस करणाऱ्या वरील अधिकाऱ्यांनी त्यांच्या जिल्ह्यासाठी फक्त दोन व्यक्तींची शिफारस करावी.<br>३) शिफारस करणाऱ्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या शिफारशी बरोबर पुढील कागदपत्रे संचालक,समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना पाठवावीत:<br>अ) शिफारस केलेल्या व्यक्तींचे संपूर्ण जीवन चरित्र<br>ब) विना दुराचार प्रमाणपत्र<br>क) गैरवर्तनासंबंधी खटला किंवा शिक्षा झाली नसल्याचे प्रमाणपत्र तसेच सार्वजनिक संपत्तीचा अपहार केला नसल्याचे प्रमाणपत्र<br>ड) व्यक्तींनी संपादीत केलेले विशेष यश किंवा केलेले उत्कृष्ट कार्य<br>इ) पारपत्र आकाराचे व्यक्तींचे छायाचित्र ( ३ प्रती)<br>ई) संचालक, समाजकल्याण,महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे किंवा शासनाकडे आलेले वैयक्तिक अर्ज विचारात घेऊ नयेत.<br>उ) अपूर्ण शिफारशी विचारात घेतल्या जाणार नाही.<br>ऊ) काही जिल्ह्यांच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणत्याही नावाची शिफारस न आल्यास संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे त्यांना योग्य वाटल्यास अशा जिल्ह्यासाठी त्या जिल्ह्यातील पात्र व्यक्तीची ह्या पुरस्कारासाठी शासनाकडे शिफारस करतील. |

| | | |
|---|---|---|
| | | <u>सामाजिक संस्थांसाठी</u><br>शिफारस करणाऱ्या अधिकाऱ्यांनी आपल्या शिफारस पत्रासोबत खालील कागदपत्रे संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे पाठविली पाहिजेत :-<br>अ) संस्था पब्लिक ट्रस्ट ॲक्ट व / वा सोसायटीज् रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० खाली पंजीबध्द असल्याचे प्रमाणपत्र<br>ब) संस्थेच्या आर्थिक व्यवहारात कोणतीही गैरव्यवस्था नसल्याबद्दलचे प्रमाणपत्र<br>क) संस्थेचे कार्य पक्षातीत व राजकारणापासून अलिप्त असल्याबद्दलचे प्रमाणपत्र<br>ड) संस्थेच्या कार्यासंबंधी थोडक्यात माहिती व संस्था समाजकल्याण या क्षेत्रात कोणते भरीव कार्य करते व आतापर्यन्त संस्थेने त्यांचे उद्दिष्ट कितपत साध्य केले आहे यासंबंधीचा अहवाल<br>इ) संस्थेच्या घटनेची प्रमाणित प्रत व मागील ५ वर्षाचे वार्षिक अहवाल |
| ८ | आलेल्या शिफारशींची छाननी | संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे हे आलेल्या सर्व अर्जांची छाननी करतील आणि अर्ज, शिफारस पुस्तिकेच्या रुपात एकत्र करून शासनाकडे विचारासाठी पाठवतील. |
| ९ | पुरस्कार जाहिर करणारे प्राधिकारी | संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून आलेल्या एकत्रित शिफारसी / प्रस्ताव यासाठी शासनाने नियुक्त केलेल्या उप समितीसमोर ठेवण्यात येतील. |
| १० | शासनाची मान्यता | १) प्रस्ताव उप समितीकडून विचारात घेतले जातील व तपासले जातील आणि समितीच्या शिफारशी शासनाकडे (सा.न्या.सां.का.क्री. व वि.स. विभाग) मान्यतेसाठी पाठविले जातील. संशयास्पद प्रकरणी सुध्दा समितीच्या निर्णयाला शासनाची मान्यता घ्यावी लागेल. शासनाच्या मान्यतेनंतर पुरस्कार जाहीर केला जाईल.<br>२) शासनाची मान्यता अंतिम राहील आणि त्या विरुध्द अपील करता येणार नाही. |
| ११ | पुरस्काराचे वितरण | विशेष सार्वजनिक समारंभात शासनाने ठरविलेल्या ठिकाणी केंद्रीय मंत्री / राज्यपाल/मुख्यमंत्री /मंत्री प्रतिष्ठित व्यक्ती यांचे हस्ते पुरस्कार दिला जाईल आणि प्रमाणपत्रावर विभागाचे मंत्री व विभागाचे सचिव यांच्या स्वाक्षऱ्या असतील. पुरस्कार मिळालेल्या व्यक्तींचे निधन झाले असेल तर त्यांच्या /तिच्या वारसाला शासनाच्या पूर्वपरवानगीने पुरस्कार घेण्यासाठी बोलविले जाईल. पुरस्कार मिळालेल्या व्यक्तीला हा पुरस्कार व्यक्तीशः दिला जाईल व संस्थेतर्फे हा पुरस्कार अध्यक्ष, उपाध्यक्ष अथवा संस्थेने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीला देण्यात येईल. |
| १२ | समारंभाचा दिवस | प्रतिवर्षी दिनांक ६ फेब्रुवारी |
| १३ | खर्च | पुरस्कार देण्याचा समारंभ, देयके आणि इतर आकस्मिक खर्च इत्यादींकरिता होणारा खर्च सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य,क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अधिनस्त ठेवलेल्या मंजूर तरतुदीतून भागवावा आणि त्यासाठी सोबत जोडलेली पध्दती अवलंबावी. |

---------

शासन निर्णय क्र. सापु २००४/प्र.क्र. १८४/मावक ४, दिनांक १६ जुलै, २००४ चे सहपत्र

## विवरणपत्र "ब"

### संत रविदास राज्य पुरस्कार समारंभासाठी खर्चाची पध्दती

| अ.क्र | बाब | तपशील |
|---|---|---|
| १ | पुरस्कार विजेत्यास रोख बक्षिस | रु. २१,००१/-(रुपये एकवीस हजार फक्त)पुरस्कार विजेत्यास रु. ३०,००१/-(रुपये तीस हजार एक फक्त) संस्थेस |
| २ | पुरस्कार विजेत्यास प्रवास भत्ता | १)पुरस्कार विजेत्याच्या निवासस्थानापासून समारंभाच्या ठिकाणापर्यन्त आणि परतीचे रेल्वेच्या पहिल्या वर्गाचे प्रवास भाडे किंवा इतर सार्वजनिक वाहनाचे / एस.टी. बसेसचे प्रत्यक्ष भाडे; पुरस्कार विजेता आणि त्यांची पत्नी/पती या दोघांनाही दिले जाईल.<br>२)समाजकल्याण स्वयंसेवी संस्था पुरस्कार प्राप्त करणाऱ्या संस्थेचे अध्यक्ष वा उपाध्यक्ष वा संस्थेने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीला संस्थेच्या ठिकाणापासून समारंभाच्या स्थळापर्यन्त रेल्वेचे पहिल्या वर्गाचे जाण्या-येण्याचे भाडे किंवा एस.टी. बसचे भाडे |
| ३ | इतर सवलती | पुरस्कार विजेता आणि त्याची पत्नी किंवा तिचा पती, संस्थेचा प्रतिनिधी हे पुरस्कार देण्याच्या ठिकाणी तीन दिवसांपर्यन्त शासनाचे पाहुणे राहतील. पहिल्या दिवशी पुरस्कार विजेत्याचे आगमन व त्यांचे स्वागत करणे, दुसऱ्या दिवशी पुरस्कार वितरण समारंभ आयोजित करणे व तिसऱ्या दिवशी पुरस्कार विजेत्यांना प्रेक्षणीय स्थळे दाखविण्याचा कार्यक्रम आयोजित करणे आणि त्यांच्या राहण्याच्या जेवणाचा प्रवास भत्ता आणि स्थानिक वाहतुक खर्च शासनाकडुन केला जाईल. शासनाने ठरविलेल्या दरानुसार राज्य पातळीवरील समितीच्या अशासकीय सभासदांना देण्यात येणाऱ्या प्रवास भत्याप्रमाणेच पुरस्कार विजेता आणि त्याची पत्नी / तिचा पति, संस्थेचा प्रतिनिधी प्रवासभत्त्यास प्राप्त समजले जातील. |
| ४ | सन्मानपत्र, शाल, साडीखण इत्यादी देणे | पुरस्कार विजेत्यास / संस्थेस सन्मानपत्र शाल किंवा साडी खण (ब्लाऊजचे कापड) एक श्रीफळ (नारळ) आणि पुरस्कार विजेत्याच्या पत्नीस किंवा पतीस एक श्रीफळ |

---------

शासन निर्णय क्र. संपु २००४/प्र.क्र. १८४/मावक ४, दिनांक १६ जुलै, २००४ चे सहपत्र

## विवरणपत्र "क"

संत रविदास पुरस्कारासाठी खर्चाचा तपशील

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १ | पुरस्कार विजेत्या व्यक्तीस रोख पुरस्कार | रु.२१,०००/- |
| २ | प्रत्येक संस्थेला रोख पुरस्कार | रु. ३०,००१/- |
| ३ | पुरस्कार विजेती व्यक्ती व संस्थांना तुलनची/ हिमरु शाल - प्रत्येकी | रु. ३००/- |
| ४ | भोजन खर्च | रु. ५००/- |
| | **समारंभाचा सामायिक खर्च** | |
| ५ | प्रवास खर्च - सर्वांकरिता एकूण | रु. १०००/- |
| ६ | पुरस्कार विजेत्या व्यक्ती व संस्था यांना शासकीय भोजन | रु. १०००/- |
| ७ | हॉल भाडे, रंगमंच सजावट, हॉल सजावट इत्यादी | रु. १०००/- |
| ८ | नारळ, हार, गुच्छ इत्यादी | रु. ३००/- |
| ९ | लक्झरी बस भाडे, सरकारी वाहनाचे पेट्रोल, प्रेक्षणीय स्थळांना भेटी, हारतुरे व रेस्ट हाऊसचे भाडे इत्यादी | रु. १०००/- |
| १० | टॉवेल, साबण, टूथपेस्ट, कंगवा इत्यादी | रु. २००/- |
| | एकूण सामायिक खर्च | रु. ४,५००/- |

आणि इतर खर्च उदा. हार, स्टेज, गुच्छ, फर्निचर, हॉलचे भाडे, वहातुक खर्च, समूह छायाचित्र, साधनसामुग्री, कामगार आणि अल्पोपहार खर्च इत्यादी योग्य त-हेने करावा.

टीप :- सन्मानपत्र हस्तपुस्तिका आणि आमंत्रण पत्रिका शासकीय मुद्रणालयाकडून छापून संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे हे आहरण व वितरण अधिकारी असतील आणि यासाठी लागणाऱ्या खर्चास मंजूरी देणे व ठरवून दिलेल्या बाबींनुसार खर्च करण्यासाठी त्यांना प्राधिकृत केले आहे. सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी या योजनेसाठी अर्थसंकल्प तरतूदीची हमी द्यावी.

---------

# अर्जाचा नमुना (व्यक्तीसाठी)

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

| पास पोर्ट फोटो (अलीकडील) |
|---|

**पुरस्काराचे नांव:-**

**वर्ष:-**

**जिल्ह्याचे नांव:-**

| | | |
|---|---|---|
| १ | व्यक्तींचे संपूर्ण नांव | |
| २ | संपर्क (मोबाईल/दुरध्वनी ) क्रमांक | |
| ३ | व्यक्तीचा पत्ता (संपूर्ण पत्रव्यवहाराचा पत्ता ) | |
| ४ | जन्मतारीख (शाळा सोडल्याचा दाखला/ आधार कार्ड/ दहावी बोर्डाचे प्रमाणपत्र/ जन्म दाखला) | |
| ५ | वय :- | |
| ६ | शिक्षण (अंतिम शैक्षणिक अर्हता नमुद करावी) | |
| ७ | जात:- (मागासवर्गीय असल्यास जातीचा दाखल्याची प्रत सोबत जोडावी) | |
| ८ | नोकरी/ व्यवसाय | |

| | | |
|---|---|---|
| ९ | जिल्हा दक्षता समिती यांचे शिफारस पत्र | |
| १० | अर्जदाराचे चारित्र्य प्रमाणपत्र/ विना दुराचार प्रमाणपत्र (पोलीस विभागाचा दाखला) | |
| ११ | शासकीय /अशासकीय पदावर नियुक्त आहे काय, (असल्यास पदाचे व कार्यालयाचे नाव) | |
| १२ | अनु.जाती/जमाती/ भटक्या विमुक्त जाती/मनोदुर्बल/ अपंग/कुष्ठरोगी इत्यादी कार्यक्षेत्रात महत्वाचे कार्य केल्याचा तपशील ( माहीती सोबत जोडावी ) | |
| १३ | भूमीहीन शेत मजुर व कामगारांसाठी केलेल्या उल्लेखनीय कामाचा तपशील (पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कारासाठी) | |
| १४ | मातंग समाजासाठी सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व आर्थिक दृष्टया कल्याणासाठी केलेल्या उल्लेखनीय कामाचा तपशील (साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कारासाठी) (फक्त मातंग समाजातील समाजसेवक, कलावंत व साहित्यिक यांना सदर पुरस्कार प्रदान करण्यात येतो.) | |
| १५ | समाज कल्याण क्षेत्रात चर्मकार समाज व दलित समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण, आरोग्य, अन्यायनिर्मुलन, अधंश्रध्दा निर्मुलन, जन जागरण इत्यादी क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामाचा तपशील (संत रविदास पुरस्कारासाठी) | |
| १६ | सामाजिक सेवेचा कालावधी | |
| १७ | व्यक्तीचे साहित्य, कला, अंधश्रध्दा, शैक्षणिक क्षेत्रातील योगदान. | |

| | | |
|---|---|---|
| १८ | पत्नीचे नाव व वय | |
| १९ | यापुर्वी इतर पुरस्कार/बहुमान मिळाला आहे काय, पुरस्काराचे नांव (कोणत्या क्षेत्रात) | |
| २० | व्यक्ती कार्यकर्ता यांनी त्यांचे समाज सेवेच्या कालावधीत केलेल्या कामाचा तपशील (कागदोपत्री पुरावे, कात्रणे, फोटोग्राफ, लेख, पुरस्काराचे फोटोग्राफ, प्रशस्तीपत्रे इत्यादी,) माहिती सोबत जोडावी. | |
| २१ | शिफारस करणाऱ्या नामांकीत व्यक्तिचे नाव पद | |

टिप : प्रत्येक पुरस्कारासाठी स्वतंत्र अर्ज करावा, एका वर्षात एकाच पुरस्कारासाठी विचार केला जाईल.

दिनांक :     /     /२०२२                                        (अर्जदार व्यक्तीचे स्वाक्षरी व नाव )

**कार्यालयीन उपयोगासाठी:-**

प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग/ सहायक आयुक्त, समाजकल्याण अभिप्राय / शिफारस------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

प्रादेशिक उपायुक्त,समाज कल्याण विभाग                                        सहायक आयुक्त, समाज कल्याण